Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA








Volume - X, Issue - I,
January - March - 2021
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com




Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X Issue - I January - March - 2021

MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | भारतातील दारिद्र्य: एक अभ्यास<br>**डॉ. लिलाधर डी. खरपुरिये** | ७०-७५ |
| १५ | भारतीय दुग्ध व्यवसाय: सद्यस्थिती, समस्या व उपाय<br>**प्रा. डॉ. मारोती धोंडीबा कच्छवे** | ७६-८१ |
| १६ | दारिद्र्य<br>**डॉ. मदनपुरे व्यंकटेश काळूराम** | ८२-८८ |
| १७ | भारतीय अर्थव्यवस्थेतील आर्थिक विषमतेचे वास्तव<br>**प्रा. डॉ. श्रद्धानंद बा. माने** | ८९-९१ |
| १८ | जागतिकीकरण व भारतीय आर्थिक धोरण<br>**प्रा. डॉ. सरवदे एम. पि.** | ९२-९५ |
| १९ | भारतीय शेतीच्या अल्प उत्पादकतेची कारणे<br>**पुरुषोत्तम रंगराव चाटे** | ९६-९८ |
| २० | भारतातील महागाई - कारणे व परिणाम<br>**प्रा. डॉ. राजेश्री अप्पाराव जाधव** | ९९-१०५ |
| २१ | शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी माध्यमांद्वारे चित्रांकनाची भूमिका<br>**रामचंद्र नारायण चौरे**<br>**प्रा. डॉ. शिरिष अंबेकर** | १०६-१०८ |
| २२ | शेतकरी आत्महत्या कारणे व उपाय<br>**डॉ. रत्ना लाला जवरास** | १०९-११३ |
| २३ | वाढती लोकसंख्या आणि आर्थिक विकास<br>**प्रा. डॉ. रत्नाकर रामराव कांबळे** | ११४-११८ |
| २४ | महागाई व पैशाचे मुल्य की अवमुल्यन<br>**प्रा. डॉ. रेणुकादास बोन्नर** | ११९-१२३ |
| २५ | भारतीय शेती आणि उत्पादकता मूल्यमापन<br>**प्रा. डॉ. संध्या पुंडलिकराव सोनकांबळे** | १२४-१२७ |


Dist. Parbhani

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com) AP-3

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

# १५. भारतीय दुग्ध व्यवसायः सद्यस्थिती, समस्या व उपाय

प्रा. डॉ. मारोती धोंडीबा कच्छवे
वाणिज्य विभाग प्रमुख, व संशोधन मार्गदर्शक, कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी.

**प्रस्तावना (Introduction)**

शेतीपूरक व्यवसायामध्ये 'दुग्ध व्यवसाय' हा पूर्वी पासूनच पंरपरागत चालत आलेला महत्वाचा व्यवसाय आहे. दुग्ध व्यवसायासाठी प्रामुख्याने संकरीत गाई, गावठी दुधाळ गाई आणि दुधाळ म्हशी पाळल्या जातात. प्रचलीत पध्दतीने दुग्ध व्यवसाय करण्यापेक्षा आधुनिक तंत्राने व्यापारी दृष्टय्या हा व्यवसाय केल्यानंतर निश्चीतपणे शाश्वत धंदा असून आर्थिक दृष्टय्या चांगला परवडतो. ज्या लोकाजवळ शेतजमीन नाही त्यांनाही हा व्यवसाय लाभदायी ठरतो. मानवी समाजाच्या विकासाबरोबरच पशुपालनाचे महत्व मानवाला समजलेले दिसून येते. पशुपालन व दुग्ध व्यवसायामुळे मानवाची अन्नाची गरज पुर्ण झाली आहे. तसेच शेतीच्या कामासाठी लागणारी बैल व रेडे उपलब्ध झाली. पशुपालनामुळे शेतीसाठी उत्तम खत मिळतो. त्यामुळे अन्धान्याच्या उत्पादनात वाढ होते. दुग्ध व्यवसायामुळे मानवी आर्थिक व सामाजिक विकास झालेला दिसून येतो. ग्रामीण भागातील शेतकरी व बेरोजगारांना दुग्ध व्यवसाय हा महत्वाचा ठरत आहे. दुग्ध व्यवसायामुळे ग्रामीण तरूणांना रोजगारांच्या संधी मोठ्या प्रमाणात मिळत आहेत. दुधापासून तूप, दही, पनीर, श्रीखंड, पेढे इ. खाद्यपदार्थ तयार केले जातात. अशा पदार्थाना शहरी व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात मागणी वाढलेली दिसून येते.

भारतातील महाभारत, वेद या ग्रथांत दुध व दुधजन्य पदार्थाचा उल्लेख आढळतो. श्रीकृष्णाने गोकुळातील लोकांना दुधाचे महत्व सांगितल्याचा उल्लेख आहे. मथूरा ही त्याकाळी दुधाची मोठी बाजारपेठ होती. दुग्ध आणि त्यापासून तयार करण्यात आलेल्या पदार्थाचा अन्न म्हणून वापर ब-याच वर्षापासून होत असला तरी दुग्ध व्यवसायाचा विकास मात्र एकोनिसाव्या शतकाच्या मध्यार्पयत फारसा झालेला नव्हता इ.स. 1950 च्या पूर्वीच्या कालखंडात दुग्ध व्यवसाय कौटुंबिक पातळीवर होत असे. स्वत:च्या गरजेपुरती जनावरे शेतावर वस्ती करणारे बहुसंख्य लोक पाळत असत. शहरवस्तीच्या आसणा-या खेड्यातील शेतकरी दुध डोक्यावरून वाहून नेवून शहरातील लोकांची दुधाची गरज भागवीत. हीच खेडी हळूहळू दुग्धोत्पादन केंद्रे बनली, प्राण्यांच्या शेणाचा शेतात खत म्हणून वापर केला जातो. त्यामुळे अन्नधान्य उत्पादनात वाढ होते. दुग्ध व्यवसाय हा शेती व्यवसायाला पुरक व्यवसाय म्हणून केला जातो. त्यामुळे लोकांना रोजगार मिळतो. दुग्ध व दुग्धजन्य पदार्थ यांच्या विक्रातून चांगली किंमत मिळते. हा व्यवसाय करण्यासाठी कोणात्याही व्यक्तीला खास असे व्यवसाय विषयक प्रशिक्षण पुर्ण घेता करता येतो.

Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani AP-3

Late Ramesh Warpudkar ACS College, Sonpeth Dist Parbhani

**संशोधनाचे उद्देश**

1. दुग्ध व्यवसायाची सद्यस्थिती पाहणे.
2. दुग्ध व्यवसासमोरील समस्या शोधणे.
3. दुग्ध व्यवसायासमोरील समस्येवर उपाय सुचविणे.
4. निष्कर्ष काढणे.

**संशोधनाची गृहितके**

1. दुधाचे उत्पादन ग्रामीण भागात होत असेल तरी त्याची मोठी बाजारपेठ शहरामध्ये दिसून येते.
2. ग्रामीण भागातील लोकांना रोजगार मिळवून देण्याची क्षमता या व्यवसायात आहे.

**अभ्यासाची पध्दती**

सदरील शोधनिंबधासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर केला असून यामध्ये संदर्भ ग्रंथ, दै.वर्तमानपत्रातील लेख, मासिके, इंटरनेट इत्यादीचा आधार घेतलेला आहे.

**भारतीय दुग्ध व्यवसाय**

भारतात जास्तीतजास्त लोक ग्रामीण भागात राहतात. हे लोक प्रामुख्याने शेती व शेती संबंधीत व्यवसाय करतात. परंतु दुग्ध व्यवसाय करण्या-यांचे प्रमाण जास्त आहे. भारतात सुमारे आठ लाख एवठी खेडी आहेत. या खेड्यातील 70 दशलश लोक दुग्धव्यवसायात गुंतलेले आहेत. म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राला जोडधंदा म्हणून व ग्रामीण भागातील बेकारीचा प्रश्न सोडविण्यासाठी दुग्धव्यवसायाला महत्वाचे स्थान आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी 62 टक्के लोकसंख्या शेतीवर उपजिविका करतात. भारतीय अर्थव्यवस्थेचा शेती हा कणा आहे. ही शेती मान्सूनच्या पावसाचा जुगार आहे. पावसाच्या अनियमीत उत्पादीत होते. अशावेळी जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय करतात.

आहारात प्रत्येकाला प्रतिदिनी 300 मि.ली दुधाची गरज भासते. वाढत्या लोकसंख्येला दुधाचे उत्पादन वाढविणे फार गरजेचे आहे. आपल्याकडे गाईपासून 45% आणि म्हशीपासून 52 % दुध मिळते. गाईच्या एक लिटर दुधातून 600 किलो कैलरीज आणि म्हशीच्या दुधापासून अनेक विविध प्रदार्थ तयार करता येतात. दुग्ध व्यवसायामुळे दूध उत्पादक शेतक-यांना आवश्यक अन्न मिळते. भारतात एकूण दूध उत्पादक शेतक-यांपैकी 80% दुध उत्पादक हे भुमिहीन शेतमजूर, अल्पभूधारक आहेत. तसेच विविध जातीजमातील लोक, दारिद्रय रेषेखालील लोक, सुशिक्षीत बेरोजगार यांना देखील या व्ससायापासून रोजगार मिळतो. हा व्यवसाय सहकारी तत्वावर केल्यामुळे ग्रामीण भागातील दुध उत्पादक शेतक-यांच्या दुधाला खात्रीची बाजारपेठ व योग्य भाव मिळल्यामुळे त्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारलेली आहे.

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

**दुग्ध व्यवसायाचा विकास**

भारतीय दुग्धक्रांतीचे जनक **डॉ.व्हर्गीय कुरियन** यांनी भारताला जगातला सर्वात मोठा दुग्धोत्पादक देश बनविले. 'अमूल' या दुग्धप्रकिया उद्योगाच्या जडणघडणीत त्यांचा मोठा वाटा होता. 1860 मध्ये पुणे येथे पहिली पशुवैद्यकीय शाळा सुरू झाली. त्या ठिकाणी शेतक-यांना जनावरांच्या जाती व रोगांची माहिती दिली जाऊ लागली. 1868 मध्ये पशुपालनाच्या आरोग्यासाठी कमिशन नेमले. या कमिशनच्या शिकारशीनुसार पहिले पशुवैद्यकिय महाविद्यालय हिस्सार (हरियाना) येथे स्थापन झाले. 1919 ला पहिली जणगणना केली. 1913 मध्ये अलाहबाद (उत्तरप्रदेश) खेत्रा येथे पहिली. सहकारी दुग्ध संस्था स्थापन झाली. त्यांनतर बडोदा, बेळगाव, हुबळी, कोलकत्ता, बागलकोटा, इ. ठिकाणी दुग्ध संस्था स्थापन झाल्या. 14 डिसेंबर, 1946 रोजी गुजराथ राज्यात खेडा जिल्हयात आंनद ठिकाणी आधुनिक पध्दतीने सहकारी तत्वावर 'खेडा जिल्हा सहकारी दुग्ध उत्पादक संस्था' स्थापन झाली. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत पशुपालन व दुग्ध व्यवसायासाठी विशेष अशी तरतूद करण्यात आली. 1965 मध्ये **'राष्टीय दुग्ध व्यवसाय विकास महामंडळाची'** स्थापना झाली. या महामंडळाची उदिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

1. संपूर्ण देशात दुधाचे उत्पादन वाढविणे.
2. दुध उत्पादकांना दुधासाठी कायमची बाजारपेठ मिळवून देणे.
3. दूध खरेदी व विक्रीचे भाव योग्य ठेवणे.
4. दुध उत्पादकाची आर्थिक परिस्थिती सुधारणे.
5. शहरी भागातील दुधाची गरज भागवणे.

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत दुग्ध व्यवसायाचे स्थान महत्वपूर्ण आहे. महाराष्ट्रात सहकारी चळवळ लवकर सुरू झाली. व तिची सर्व क्षेत्रात जोमाने प्रगती झाली. मुंबई शहरातील लोकांना निर्भेळ व स्वस्त दुध उपलब्ध व्हावे या उदेशाने नागरी पुरवठा विभागाचा प्रशासनाच्या नियत्रंणाखाली मुंबई दुध योजनेची स्थापना 1947 साली केली. दुधाचे उत्पादन वाढविण्यासाठी **'आरे'** गवळीवाडयाची स्थापना 1957 मध्ये केली. त्यावेळी मुंबईकरांना स्वच्छ व सकस दुध पुरविणे हा हेतू होता. ग्रामीण भागातील उपजीविकेचे साधन म्हणून असलेल्या दुग्ध व्यवसायाच्या विकासावर भर देण्यात आला. 1 डिसेंबर, 1971 रोजी राज्यात सहकारी तत्वावरील **"पहिली दुधावर प्रक्रिया करणारी दुग्धशाळा पुणे"**(कात्रज) येथे कायान्वीत झाली. मार्च 2015 अखेर 24,762 सहकारी दुग्ध संस्था व 88 सहकारी दुग्ध संघ होते.

**दुग्ध व्यवसायासमोरील समस्या**

आजही दुग्ध व्यवसायात दुधाच्या प्रतीनुसार भाव मिळत नाही. दिवसेंदिवस दुधाच्या भेसळीचे प्रमाण वाढत आहे. शेतक-यांचे दुध उत्पादीत केल्यानंतर पुढील सर्व पातळ्यावर दुधात जास्तीत जास्त भेसळ होऊन शेवटी ग्राहकांना निष्कृष्ट दर्जाचे दुध पोहोचते.

1. **चारा आणि खाद्याच्या नियोजनाच्या अभाव** - शेतकरी आणि शासनाला जास्त पैसा देणा-या या व्यवसायाठी लागणा-या चारा पिकासाठी फक्त तीन टक्के क्षेत्र आहे. चारा पिकाला अनेक ठिकाणी पाण्याचीही उपलब्धता करून दिली जात नाही. दुध उत्पादकही वर्षभराच्या चा-याचे नियोजन करत नाही. जास्त दुध देणा-या विविध जातीच्या जनावरांना पुरेशा प्रमाणात पशुखाद्य मिळत नाही. पावसाचे कमी प्रमाण, कुरणांची टचाई इत्यादीमुळे दुध उत्पादन क्षमतेवर प्रतिकुल परिणाम होतो म्हणून जनावरांना पशुखाद्यायाचा पुरवढा नियमित आणि रास्त दराने होणे आवश्यक असते.
2. **आपु-या वैद्यकीय सुविधा** - जास्त दुध देणा-या गायी व चांगल्या जातीच्या म्हशी यांच्यासाठी थंड हवामान आणि चांगली पशुखादे आवश्यक असतात. त्यांना अनुकुल वातावरण आणि खाद्ये मिळत नाही तर अशी जनावरे रोगांना बळी पडण्याची भिती असते त्यामुळे त्यांची दुध देण्याची क्षमता एकदम कमी होते.
3. **दुधात घट होते** - खेडयात दुध उत्पादक प्राथमिक सहकारी दुध उत्पादक संस्थेत दुध विकतात. या संस्था तालुका व जिल्हा दुध संघास दुधाची विक्री करतात. दुधाची हाताळणी करताना दुध सांडणे, खराब होणे, चोरी होणे, चारा टंचाई जनावरांचे कमी प्रमाण, कमी पाऊस पडत असल्यामुळे चारा कमी उपलब्ध होतो. याचा परिणाम दुधाचे प्रमाण घटून शेतक-यांचे नुकसान होते.
4. **हिरव्याचा-यांचा अभाव** - दुभत्या जनावंराना हिरव्या चा-याची गरज असते. हिरव्या चा-यामुळे दुभती जनावरे जास्त दुध देवू शकतात. भारतातील शेती ही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे काही मोजक्याच शेतक-यांच्या शेतात पाण्याची सुविधा असते. असे शेतकरी हिरव्या चा-याची लागवड करून दुभती जनावरे सांभाळतात. ऊस करखाना सुरू असताना जनावरांना फक्त ऊसाचे वाढे खाऊ घालून दुग्ध व्यवसाय केला जातो. परंतु वाढ्यामुळे असलेल्या ऑग्झिलेटमुळे जनावरांच्या शरीरातील कॅल्शियम कमी होवून गाईचे आयुष्य कमी होते.
5. **योग्य किंमतीचा अभाव** - दुध उत्पादक शेतीला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसायाकडे वळला परंतू दुध उत्पादकापेक्षा दुध संस्था लाखो रूपये मिळवितात. दुध उत्पादकांना समाधानकारक दर मिळत नसल्यामुळे दुध धंदा अडचणित सापडला आहे. अनेक दुध उत्पादक भांडवलाच्या अभावी कमी दुध देणारी जनावरे पळतात त्यामुळे त्यांचा सरासरी दुध उत्पादनाचा खर्च नेहमी जास्त असतो. पशुखाद्य, चारा वैरण, पेंढ यांच्या किंमती दिवसेंदिवस वाढत आहेत त्यामुळे दुधाच्या खर्चात वाढ होते.

7. **शीतग्रहाच्या सोयीचा अभाव** - अनेक शेतक-याजवळ व प्राथमिक सहकारी दुध संस्थेजवळ दुध साठविण्यासाठी पुरेशा सोयी नसतात. तसेच शीतग्रहाचा अभाव असतो. शीतग्रहाची सुविधा उपलब्ध

नसल्यामुळे शेतक-यांनी दुध विकण्यास आणले तरी या संस्थेकडे साठवणूकीच्या सुविधा नसल्यामुळे त्यांची खरेदी करू शकत नाहीत. शीतग्रह नसल्यामुळे दुग्ध खराब होण्याची शक्यता जास्त असते.

8. **वाहतुकीच्या अपु-या सुविधा** - देशातील ग्रामीण भागात वाहतुकीच्या साधनांच्या अनेक समस्या आहेत. पक्के रस्ते नाहीत. खराब रस्त्यामुळे खेडयातील दुध संकलन करण्यासाठी अडचणी येतात. वेळेवर दुधाची वाहतुक करत न आल्यामुळे दुध खराब होते.

9. **दुधाचा दर्जा** - दुध उत्पादकांना दुधातील स्निग्धतेचे प्रमाण तपासून त्यानुसार किंमत दिली जावी अशी अपेक्षा असते. परंतु ब-याच सहकारी दुग्ध संस्था दुधातील स्निग्धेतेचे प्रमाण मापन करीत नाहीत. दुधात स्निग्धतेचे प्रमाण जास्तीचे प्रमाण दाखविण्यासाठी शेतकरी अनेक मार्गाचा अवलंग करतात. कर्मचारी स्निग्धतेचे कारण सांगून दुधास कमी दर देतात.

10. **चारा छावण्याचा अभाव** - शेतक-यांच्या नशिबी हा अधूनमधून दुष्काळ येतो. दुष्काळच्या काळात जनावरांचे संवर्धन करणे फार अवघड होऊन बसते. आवश्यक छावण्या शासनाकडून उभारल्या जात नाहीत. त्यामुळे चा-या अभावी जनावरे कमी प्रमाणात पाळली जातात. त्याचा वाईट परिणाम दुग्ध व्यवसायावर फार मोठ्या प्रमाणात होतो.

**दुग्ध् व्यवसाय वाढविण्यासाठी उपाय**

1. **शीतग्रहाची सोय करावी** - शासनाने पुरेशा प्रमाणात अत्याधुनिक पध्दतीने दुध साठविण्याची सोय आणि त्याच्या शुध्दीकरणाची सोय उपलब्ध करून दिली पाहिजे. यामुळे दुग्ध व्यवसायात मोठ्या प्रमाणात वाढ होईल.

2. **योग्य किंमत-** दुध उत्पादकांना दुधाची किमंत योग्य मिळाली पाहिजे दुधाचा उत्पादन खर्च जास्त असतो. तर शेतक-यांना उत्पादन खर्चानुसार योग्य किंमत मिळाली नाही तर दुधाचा दर्जा टिकवणे अशक्य हाईल. दुधात पाणी मिसळणे असे प्रकार रोखण्यासाठी त्यांच्या दुधास योग्य किंमत मिळणे आवश्यक आहे.

3. **प्रशिक्षणाची सोय-** दुधाचे उत्पादन वाढविण्यासाठी ग्रामीण भागातील दुध उत्पादकांना दुग्ध व्यवसायाचे महत्व सांगून प्रशिक्षण देण्याची सोय उपलब्ध करून देणे महत्वाचे आहे. दुध संकलन संस्थेतील कर्मचारी आणि संचालकांना सहकाराचे व दुग्ध व्यवसायाचे शास्त्रशुध्द प्रशिक्षण दिले पाहिजे.

4. **पायाभुत सुविधा परविणे** - दुग्ध व्यवसायाचा निकोप विकासासाठी ग्रामीण भागात पुरेशा प्रमाणात विकास केला पाहिजे. ग्रामीण भागाचे विधूतीकरण, पिण्याच्या पाण्याची सोय, दुध वाहतुकीची सोय, रस्ते बांधणी इत्यादी. त्यामुळे दुधाची वाहतुक जलदगतीने करता येईल आणि दुध खराब होण्याचे व घटण्याचे प्रमाण कमी हाईल.

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



5. **हिरव्या चा-याची सोय** - दुधाळ जनावरांना हिरव्या चा-यांची फार गरज असते. त्यासाठी शासनाने फार मोठ्या प्रमाणावर विहीरी, कालवे, तलाव, बंधारे, विहीरीचे पुर्नभरण, जलसिंचनाचा पुरवठा इत्यादीसाठी अनुदान देणे महत्वाचे आहे. त्यामुळे शेतीत हिरवा चारा फार मोठ्या प्रमाणात तयार होवू शकतो. परिणामी दुग्ध व्यवसायात वाढ होऊन उत्पादन वाढते.

6. **अविकसीत भागांना प्राधान्य द्यावे** - सरकारी दुग्ध संस्थाची स्थापना करताना भागास (अविकसीत) भागांना प्राधान्य देण्यात यावे. त्यामुळे तेथील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होईल. त्या भागात दुधाचे उत्पादन वाढविण्यास मदत होवून सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून आणणे शक्य होईल.

7. **दुग्धजन्य पदार्थाचे उत्पादन** - दुधाच्या विक्रीपासून जेवढे उत्पन्न मिळते ते उत्पन्न अन्य पदार्थापासून मिळत नाही. परंतू दुधापेक्षा जास्त किंमत दुग्धजन्य पदार्थास मिळत असते. तुप, लोणी, खवा, पेढे, बासुंदी, इत्यादी पदार्थाना दुधापेक्षा जास्त किंमत मिळते.

**निष्कर्ष**

सध्याचे युग हे जागतिकरणाचे असून या युगात जागतिक बाजारपेठ सर्वासाठी खुली आहे. या आतंरराष्ट्रीय बाजारपेठेत दुधाची पत टिकवयाची असेल तर आपल्या देशातील दुधाची पत उच्च दर्जाची असली पाहिजे. शासनाकडून दुग्ध व्यवसायाच्या संरचनात्मक बाबीचा विकास घडवून आणला पाहिजे. उच्च् दर्जाची जनावरे आयात करून त्यासाठी लागणारे खाद्यपदार्थ, वैरण, पेंढ व हिरवा चारा मुबलक प्रमाणात उपलब्ध झाला पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ**

1. डॉ.भास्कर गायकवाड : दै. लोकसत्ता
2. प्रा. नानासाहेब पटनुनेव इतर : ग्रामीण अर्थशास्त्र, अरूण प्रकाशन लातुर.
3. गंगाधर कराळे: ग्रामीण विकासाचा एकांलकि दृष्टीकोन निति, कार्यक्रम &व्यूहरचना श्री मंगेश प्रकाशन नागपुर.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani